राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

महाराष्ट्र शासन

The Collaborators for Transforming Education

केंद्रस्तरीय

# शिक्षण परिषद

## सुधारित मार्गदर्शिका २०२६

*(विचार, संवाद आणि परिवर्तनासाठी)*



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
ग्यानप्रकाश फाउंडेशन, पुणे.

gyan prakash FOUNDATION

# केंद्रस्तरीय शिक्षण परिषद सुधारित मार्गदर्शिका


**प्रवर्तक :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन

**प्रकाशक :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व ग्यानप्रकाश फाउंडेशन, पुणे.

**प्रेरणा :** **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.

**मार्गदर्शन :** **मा. सचिंद्र प्रताप सिंह (भा.प्र.से.)**
आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

**संपादक :** **मा. डॉ. हेमंत वसेकर (भा.प्र.से.)**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**सह संपादक :** **डॉ. कमलादेवी आवटे**
सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
**श्रीम. ज्योती शिंदे**
उपसंचालक, मानव संसाधन विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**कार्यकारी संपादक:** **डॉ. दत्तात्रय थिटे**
सहायक संचालक, (सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास विभाग),
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**संपादन सहाय्य:** **श्रीम. राजेश्वरी संधानशिवे**
कार्यक्रम अधिकारी, सीपीडी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**तांत्रिक सहाय्य:** **श्री. शैलेश दखने**
विषय सहायक, सीपीडी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
**श्रीमती स्वाती वनारसे**
लघुलेखक, सीपीडी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**प्रथम आवृत्ती:** २०१९

**सुधारित आवृत्ती:** २०२६

**अर्थसहाय्य:** एडलगिव्ह फाउंडेशन, मुंबई (Collaborators for Transforming Education Programme),
**ग्यानप्रकाश फाउंडेशन, पुणे**

# प्रस्तावना

केंद्र शासनातर्फे पारित झालेल्या "बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षण अधिकार २००९" या कायद्यान्वये भारत देशातील प्रत्येक मुलाचा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मान्य केला गेला आहे.

हे प्रत्यक्षात साध्य करायचे असेल तर प्रत्येक मुलाची सध्याची शैक्षणिक स्थिती समजून घेऊन, मूल तेथून पुढे कसे जाईल याकरिता प्रयत्न झाले पाहिजेत. शिक्षण व्यवस्थेचा विचार करता "केंद्र" हे शाळा आणि प्रत्यक्ष मुले यांच्याशी दैनंदिन निगडीत असे शैक्षणिक बदलांचे अत्यंत प्रभावी व पुनरावृत्ती शक्य असलेले एकक आहे. प्रत्येक मुलाशी, प्रत्येक शाळेशी जोडलेले "केंद्र" प्रत्यक्ष कामाच्या जवळ असते आणि केंद्रस्तरीय कामाची पुनरावृत्ती पुढे तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर करणे शक्य असते. त्यामुळेच शैक्षणिक परिवर्तनाचा मुख्य भर "केंद्र" हा असावा.

केंद्र परिवर्तनाच्या प्रक्रियेत समूह साधन केंद्र समन्वयकांचे नेतृत्व महत्त्वाचे ठरते आणि त्या बरोबरीने परिवर्तनाची प्रक्रियाही. ही प्रक्रिया म्हणजे "शिक्षण परिषद". ही एक दिशादर्शक, सातत्यपूर्ण प्रक्रिया असून त्यामुळे केंद्रातील सर्व शिक्षकांना एकत्रितपणे, सर्वांच्या सहभागातून, संख्यात्मक माहितीच्या वापरातून, शैक्षणिक विचारमंथन करत, आत्तापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेत, समस्यांवर उपाय शोधण्याची, नवीन शिकण्याची व नेमक्या गरजांवर आधारित नियोजन करण्याची संधी मिळते.

शिक्षण हक्क कायद्यास अपेक्षित ते साध्य करण्याची ताकद असलेली ही शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया राज्यातील प्रत्येक केंद्रात अधिकाधिक सजगतेने व प्रभावीपणे राबवण्यासाठी सहाय्यभूत ठरावी या हेतूने ही पुस्तिका तयार केली आहे.

शैक्षणिक परिवर्तनासाठीचे एकक – 'केंद्र'

शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया – 'शिक्षण परिषद'

केंद्रस्तरीय प्रक्रियेतील मुख्य भूमिका – 'समूह साधन केंद्र समन्वयक'

प्रभावी शिक्षण परिषदांमुळे केंद्राचे व तालुक्याचे शैक्षणिक चित्र पालटताना दिसते आहे. त्यामुळे वरील समीकरण महत्त्वाचे ठरते.

# शुभेच्छा संदेश



महाराष्ट्र राज्यातील शिक्षण व्यवस्थेत गुणवत्तापूर्ण आणि समावेशक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी शासन सातत्याने कार्यरत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचावे, त्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत सातत्याने प्रगती व्हावी आणि त्यांच्यात आवश्यक कौशल्ये विकसित व्हावीत, हा आपल्या सर्वांचा सामूहिक हेतू आहे. या दृष्टीने केंद्रस्तरीय शिक्षण परिषद ही संकल्पना अत्यंत परिणामकारक ठरत आहे.

केंद्रस्तरीय शिक्षण परिषद ही केवळ औपचारिक बैठक नसून शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला चालना देणारी, त्यांच्या अध्यापन पद्धतीत सुधारणा घडवून आणणारी आणि विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गुणवत्तेत वृद्धी साधणारी एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे शिक्षकांना आपले अनुभव मांडण्याची, इतरांकडून शिकण्याची आणि नव्या अध्यापन तंत्रांचा अंगीकार करण्याची संधी मिळते. परिणामी, वर्गातील अध्यापन अधिक परिणामकारक आणि विद्यार्थीकेंद्रित बनते.

एडलगिव्ह फाउंडेशन, मुंबई व सहभागी संस्था ग्यानप्रकाश फाउंडेशन मागील १० वर्षापासून 'CTE' (Collaborators for Transforming Education) कार्यक्रमाच्या माध्यमातून शासनासोबत काम करीत आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती. विद्या शहा यांच्या माध्यमातून हे काम सुरु झाले. त्यामधून विकसित कामाचा दस्तऐवज तयार करण्यात आला. नुकतीच विकसित केलेली केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेची मार्गदर्शिका या प्रक्रियेला अधिक स्पष्ट दिशा देण्यासाठी २०१९ च्या पहिल्या आवृत्तीनंतर आता 'केंद्रस्तरीय शिक्षण परिषद सुधारित मार्गदर्शिका २०२६' विकसित करण्यात आली आहे. मार्गदर्शिकेमुळे शिक्षण परिषदांचे नियोजन, अंमलबजावणी आणि पुनरावलोकन अधिक सुसूत्र पद्धतीने करता येईल. तसेच, केंद्रप्रमुख व केंद्र संसाधन समूह शिक्षकांना त्यांच्या भूमिकेबाबत स्पष्टता मिळून केंद्रस्तरीय शिक्षण परिषद अधिक उद्देशपूर्ण होईल.

राज्यातील सर्व जिल्हे, तालुके आणि केंद्रस्तरावर शिक्षण परिषद प्रभावीपणे राबविण्यासाठी या मार्गदर्शिकेचा उपयोग महत्त्वाचा ठरेल. केंद्रप्रमुख आणि केंद्र संसाधन समूह शिक्षक यांनी या मार्गदर्शिकेचा अभ्यास करून केंद्रस्तरीय शिक्षण परिषदा गुणवत्तापूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. यामुळे शिक्षण परिषद केवळ चर्चेपुरती मर्यादित न राहता कृतीशील आणि परिणामकारक ठरेल.शिक्षण क्षेत्रातील बदलत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांनी सतत शिकत राहणे, स्वतःच्या अध्यापन प्रक्रियेचे चिंतन करणे आणि नवीन पद्धती स्वीकारणे आवश्यक आहे. केंद्रस्तरीय शिक्षण परिषद ही या सर्व बाबींना चालना देणारी एक प्रभावी व्यासपीठ आहे. या माध्यमातून शिक्षकांमध्ये सहकार्याची भावना वृद्धिंगत होऊन एकमेकांकडून शिकण्याची संस्कृती विकसित होईल.

या मार्गदर्शिकेच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या सर्व तज्ज्ञ, अधिकारी, एडलगिव्ह फाउंडेशन आणि ग्यानप्रकाश फाउंडेशनचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांच्या अनुभव आणि अभ्यासाच्या आधारे तयार झालेली ही मार्गदर्शिका राज्यातील शिक्षण प्रक्रियेला नवी दिशा देईल, असा मला विश्वास आहे.शेवटी, या मार्गदर्शिकेचा प्रभावी वापर करून केंद्रस्तरीय शिक्षण परिषद प्रक्रिया अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आपली जबाबदारी अधिक सजगपणे पार पाडावी, ही अपेक्षा व्यक्त करतो. आपल्या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता निश्चितच उंचावेल, याबद्दल मला पूर्ण विश्वास आहे.

आपल्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

**मा. रनजीत सिंह देओल**
**प्रधान सचिव,**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

# शुभेच्छा संदेश



महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक व्यवस्थेची गुणवत्ता, समानता आणि परिणामकारकता सुनिश्चित करण्यासाठी विविध स्तरांवर सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला शिकण्याच्या समान संधी उपलब्ध करून देऊन त्याच्या क्षमतांचा सर्वांगीण विकास साधणे हे आपल्या शिक्षण व्यवस्थेचे प्रमुख ध्येय आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रस्तरीय शिक्षण परिषद ही शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी एक महत्त्वपूर्ण आणि उपयुक्त प्रक्रिया ठरते.

केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेमुळे शिक्षकांना त्यांच्या अध्यापन पद्धतींचा आढावा घेण्याची संधी मिळते. तसेच सहकाऱ्यांसोबत शैक्षणिक चर्चा करण्यास आणि विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील अडचणींवर परिणामकारक उपाय शोधण्यासही मदत होते. ही प्रक्रिया अधिक प्रभावी होण्यासाठी स्पष्ट दिशा, सुयोग्य नियोजन आणि सातत्य अत्यावश्यक आहे. याच उद्देशाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने पाच सत्रांमध्ये विकसित केलेली मार्गदर्शिका अत्यंत उपयुक्त ठरेल.

ही मार्गदर्शिका केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे नियोजन आणि अंमलबजावणी यामध्ये सुसंगती आणेल. समूह साधन केंद्र समन्वयक आणि केंद्र संसाधन समूह शिक्षकांनी एकत्रितपणे या प्रक्रियेत सहभाग नोंदवून केंद्रस्तरीय शिक्षण परिषद अधिक कृतीप्रधान आणि विद्यार्थी-केंद्रित करणे अपेक्षित आहे. यामुळे शाळा स्तरावर वर्गशिक्षणात गुणात्मक बदल घडून येतील.

शिक्षण क्षेत्रातील बदलत्या अपेक्षा लक्षात घेता शिक्षकांनी सतत शिकण्याची वृत्ती जोपासणे, नवीन अध्यापन तंत्रांचा अवलंब करणे आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्यापनात आवश्यक बदल करणे गरजेचे आहे. केंद्रस्तरीय शिक्षण परिषद ही या सर्व बाबींना चालना देणारी प्रभावी यंत्रणा आहे.

या मार्गदर्शिकेच्या निर्मितीत सहभागी असलेल्या सर्व तज्ञ, अधिकारी, एडलगिव्ह फाउंडेशन आणि ग्यानप्रकाश फाउंडेशनचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांच्या प्रयत्नांमुळे ही मार्गदर्शिका राज्यातील शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास आहे.

या मार्गदर्शिकेचा प्रभावी वापर करून केंद्रस्तरीय शिक्षण परिषद प्रक्रिया अधिक बळकट करावी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करावे, ही अपेक्षा व्यक्त करतो.

आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

**मा. सचिंद्र प्रताप सिंह (भा.प्र.से)**
**आयुक्त (शिक्षण),**
महाराष्ट्र राज्य

# शुभेच्छा संदेश



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम, संवेदनशील आणि अध्ययनशील शिक्षक घडविणे ही शिक्षण व्यवस्थेची मूलभूत गरज आहे. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी सातत्यपूर्ण शैक्षणिक संवाद, अनुभवाधारित चिंतन आणि कृतीआधारित अध्ययन यांना चालना देणारे प्रभावी व्यासपीठ म्हणून केंद्रस्तरीय शिक्षण परिषद अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने विकसित करण्यात आलेली ही मार्गदर्शिका केंद्रस्तरीय शिक्षण परिषद अधिक संरचित, उद्देशपूर्ण आणि विद्यार्थ्यांच्या शिकण्याशी प्रत्यक्ष जोडलेली करण्यासाठी तयार करण्यात आलेली आहे. परिषदेमध्ये केवळ माहितीचे आदानप्रदान न होता अध्यापनातील प्रत्यक्ष अडचणी, स्थानिक गरजा, नाविन्यपूर्ण प्रयोग आणि विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील अडथळे दूर करणारे ठोस कृती आराखडे यांवर केंद्रित चर्चा अपेक्षित आहे.

आजच्या बदलत्या शैक्षणिक संदर्भात शिक्षकांनी 'अध्ययनशील व्यावसायिक' म्हणून विकसित होणे आवश्यक आहे. सहकारी शिक्षकांची, अनुभवांची देवाण घेवाण करण्याची तसेच विद्यार्थ्यांच्या शिकण्यासंबंधित अडचणीवर सामुहिक उपाययोजना विकसित करण्याची संधी प्राप्त होते. या प्रक्रियेमुळे शाळा स्तरावर नाविन्यपूर्ण अध्यापन प्रक्रियेत गुणात्मक सुधारणा घडून येण्यास मदत होईल. तंत्रज्ञानाधारित शिक्षण, कौशल्याधारित अध्यापन, मूल्यमापनातील गुणवत्ता आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन या बाबी प्रभावीपणे रुजविण्यासाठी शिक्षण परिषद महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये अपेक्षित असलेल्या परिवर्तनशील शिक्षण प्रक्रियेच्या अंमलबजावणीसाठी शाळास्तरावर सक्षम शैक्षणिक नेतृत्व निर्माण करणे आवश्यक आहे. समूह साधन केंद्र समन्वयक, समूह संसाधन गट आणि शिक्षक यांनी सामूहिक सहभागातून परिषद अधिक परिणामकारक बनविल्यास विद्यार्थ्यांच्या शिकण्यात गुणात्मक सुधारणा घडून येतील, असा विश्वास आहे.

ही मार्गदर्शिका तयार करण्यासाठी योगदान देणारे सर्व तज्ञ, एडलगिव्ह फाउंडेशन आणि ग्यानप्रकाश फाउंडेशन यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. राज्यातील सर्व समूह साधन केंद्र समन्वयक व शिक्षकांनी या मार्गदर्शिकेचा प्रभावी वापर करून शिक्षण परिषदांना प्रेरणादायी, कृतीशील आणि परिणामाभिमुख बनवावे, ही अपेक्षा व्यक्त करतो.

या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

**डॉ. हेमंत वसेकर (भा.प्र.से.)**

**संचालक,**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

# शुभेच्छा संदेश



महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील शासकीय शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण व समावेशक शिक्षणाच्या दर्जात्मक प्रगती साठी मागील १० वर्षांपासून एडलगिव्ह फाउंडेशन, मुंबई हे 'CTE' (Collaborators for Transforming Education) कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य शिक्षण आणि क्रीडा विभाग यांच्या सोबत सहभागी संस्थांच्या मदतीने काम करीत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवून त्यांच्यात आवश्यक कौशल्ये विकसित करणे, हा आपला सामूहिक हेतू आहे. या प्रवासात 'केंद्रस्तरीय शिक्षण परिषद' हे अत्यंत प्रभावी माध्यम ठरत आहे.

शिक्षण परिषद ही केवळ औपचारिक बैठक नसून शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला चालना देणारी, अध्यापन पद्धतीत सुधारणा करणारी आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणारी सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. या प्रक्रियेला अधिक स्पष्ट दिशा देण्यासाठी २०१९ च्या पहिल्या आवृत्तीनंतर आता 'केंद्रस्तरीय शिक्षण परिषद सुधारित मार्गदर्शिका २०२६' विकसित करण्यात आली आहे.

या सुधारित मार्गदर्शिकेमुळे शिक्षण परिषदांचे नियोजन, अंमलबजावणी व पुनरावलोकन अधिक गुणवत्तापूर्ण होईल. तसेच समूह साधन केंद्र समन्वयक आणि केंद्र संसाधन समूह शिक्षकांना त्यांच्या भूमिकेविषयी स्पष्टता मिळून ही परिषद अधिक उद्देशपूर्ण व कृतीशील बनेल. राज्यातील सर्व स्तरांवर या मार्गदर्शिकेचा प्रभावी वापर व्हावा ही अपेक्षा आहे.

या मार्गदर्शिकेच्या निर्मितीत योगदान देणारे सर्व तज्ज्ञ, अधिकारी, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT) आणि ग्यानप्रकाश फाउंडेशन यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करते. ही मार्गदर्शिका राज्यातील शिक्षण प्रक्रियेला नवी दिशा देईल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आणि शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी या मार्गदर्शिकेचा आधार घेत सर्वांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, हीच सदिच्छा!

सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

**नगमा मुल्ला**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
एडलगिव्ह फाउंडेशन, मुंबई

# अनुक्रमणिका


शिक्षण परिषद - शिक्षकांसाठीची आधारव्यवस्था २

शिक्षण परिषद म्हणजे काय? ४

शिक्षण परिषदेतील सत्रे ६

सत्र पहिले ७

सत्र दुसरे ११

सत्र तिसरे १५

सत्र चौथे २०

सत्र पाचवे २२

शिक्षण परिषदेचा कृती कार्यक्रम २४

शिक्षण परिषद प्रभावी होण्यासाठी २५

समूह साधन केंद्र समन्वयकांची भूमिका २६

केंद्र संसाधन गटाची भूमिका २८

शाळाभेटी ३०

जिल्हा आणि तालुका पातळीवरून सनियंत्रण ३२

नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQs) ३५

# शिक्षण परिषद - शिक्षकांसाठीची आधारव्यवस्था

प्राथमिक शिक्षण हा बालकांच्या विकासाचा पाया आहे. या दृष्टीने शिक्षकांना मुलांच्या शैक्षणिक गरजांची नेमकी जाण असणे व त्यानुसार प्रत्येक मुलाच्या प्रगतीसाठी नियोजन करणे गरजेचे आहे. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या शासन निर्णयानुसार गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण केंद्रस्थानी ठेवून 'शिक्षण परिषद' आयोजित करणे बंधनकारक आहे. ही परिषद समूह साधन केंद्र समन्वयकांच्या नेतृत्त्वाखाली दरमहा केंद्रपातळीवर होणे आवश्यक आहे. शिक्षण परिषदेमध्ये केंद्रातील इतर शिक्षक राबवत असलेले विविध उपक्रम, अध्ययन अनुभव समजून घेणे, अनुभवांचे आदानप्रदान करणे, एकत्र येऊन आपल्याला जाणवणाऱ्या समस्या सोडवणे, पुढील महिन्यासाठीच्या अध्ययन निष्पत्ती ठरवणे, क्षमता आधारित नियोजन करणे, केंद्र संसाधन गटाचे मार्गदर्शन यातून शिक्षकांची क्षमता बांधणी होते. अशा रीतीने शिक्षकांना सक्षम होता यावे यासाठी शिक्षण परिषद एका आधारव्यवस्थेचे काम करते.

पुढील महिन्याचे नियोजन ही शिक्षण परिषदेमधील अत्यंत महत्त्वाची कृती आहे. क्षमता आधारित शिक्षणासाठी प्रत्येक मूल जिथे आहे तेथून त्याला अपेक्षित अध्ययन निष्पत्तीपर्यंत नेण्यासाठी कोणते उपक्रम, अध्ययन अनुभव, अध्यापनाच्या कृती, पद्धती राबवाव्या यांचा समावेश नियोजनात असतो. यासाठी काही मूल्यमापन चाचण्यांची आणि संख्यात्मक माहितीची मदत घेतली जाते. हे नियोजन शिक्षण परिषदेमध्ये केंद्रस्तरावर केले जाते. केंद्रस्तरावर केलेले नियोजन प्रत्येक शिक्षक, प्रत्येक शाळा यांच्यापर्यंत पोहोचते. शिवाय अशी अनेक केंद्रे असतील तर त्या पातळीवर सातत्याने बदल घडत पुढे संपूर्ण तालुका, जिल्हा यांच्यात बदल घडवून आणायची ताकद यामध्ये आहे. ज्या केंद्रांमध्ये ही प्रक्रिया अत्यंत प्रभावीपणे राबवली जाते अशा केंद्रांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सातत्याने लक्षणीय सुधारणा होताना दिसत आहे.

२

*साताऱ्यातील एकसर केंद्राच्या समूह साधन केंद्र समन्वयक श्रीमती निर्मला भांगरे म्हणतात - "शिक्षक आता दर महिन्याला होणाऱ्या शिक्षण परिषदेची उत्सुकतेने वाट बघत असतात. आपण वर्गात करत असलेले चांगले काम, जाणवणारी आव्हाने यांविषयी बोलता येईल आणि एकत्र काही उपाय शोधता येतील यासाठी एक हक्काचं व्यासपीठ या दृष्टीने ते शिक्षण परिषदेकडे बघतात. त्यांचे दर महिन्याला बाजूला ठेवलेले हे ३-४ तास सार्थकी लागतात. सर्वजण उत्साहाने आणि एका विशिष्ट हेतूने शिक्षण परिषदेत सहभागी होतात. मुलांच्या शिकण्यात सुधारणा, पटसंख्येत होणारी वाढ आणि शाळेच्या शैक्षणिक गरजा पूर्ण होण्यात शिक्षण परिषदा महत्त्वाची भूमिका बजावत आहेत."*

प्रभावी शिक्षण परिषदांची अंमलबजावणी जर राज्यातील प्रत्येक केंद्रात झाली, तर राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता विकासाला निश्चितच गती येईल. ही प्रक्रिया यशस्वी होण्यामध्ये समूह साधन केंद्र समन्वयकांची भूमिका सर्वात महत्त्वाची असते. या प्रक्रियेचे नेतृत्व करताना त्यांनी कोणत्या गोष्टींवर भर द्यावा, शिक्षण परिषदेच्या विविध कृती कार्यक्रमांचे वेळापत्रक काय असावे इ. गोष्टी समजून घेण्याकरता या पुस्तिकेची मदत होईल अशी आशा आहे.

*नाशिकमधील वाडीवऱ्हे केंद्राच्या समूह साधन केंद्र समन्वयक श्रीमती वसुंधरा इगवे म्हणतात - "पूर्वी मी केंद्रातील शाळाभेटी करत असे तेव्हा कित्येक वर्गातील मुले बोलत नसत. त्यांच्यात आत्मविश्वासाची कमतरता जाणवत असे. गेले दीड वर्ष नियमित आणि वर्गप्रक्रियेला केंद्रस्थानी ठेवून शिक्षण परिषदा व्हायला लागल्या आहेत तसे शिक्षकांच्या वर्गप्रक्रियेत बदल घडून येताना दिसतात. आता हीच मुले वर्गात मनापासून सहभागी होताना, बोलताना आणि आपलं म्हणणं मांडताना दिसतात."*

३

# शिक्षण परिषद म्हणजे काय?

एका केंद्रातील सर्व शिक्षकांनी एकत्र येऊन दर महिन्याला, उद्देशपूर्ण मासिक नियोजनासाठी केलेली सामूहिक बैठक म्हणजे शिक्षण परिषद होय. या बैठकीत शिक्षक खालील गोष्टींवर काम करतात:

- आपण शिकवत असलेल्या विषयांवर/ शिकवण्याच्या पद्धतींवर चिंतन करणे: 'शिकवताना मला काय चांगले करता आले आणि कुठे सुधारणा करायला हवी?' याचा विचार करणे.
- मासिक नियोजनासाठी एकत्र येणे: पुढील पाठांचे, मूल्यांकनाचे तसेच मुलांच्या एकूण शैक्षणिक प्रगतीमध्ये पालकांचा नेमका सहभाग कसा मिळवायचा याचे नियोजन करणे.
- मुलांच्या शैक्षणिक प्रगती संदर्भात जाणवणाऱ्या समस्यांवर एकत्रितपणे तोडगा काढणे.

शिक्षण परिषद योग्य प्रकारे राबवल्यास, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार आवश्यक असलेला शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (Continuous Professional Development) साध्य करता येऊ शकतो.




४

## शिक्षण परिषद का आवश्यक आहे?

- एखाद्या केंद्रातील जवळपासच्या शाळांमधील शिक्षकांची भौगोलिक आणि सामाजिक परिस्थिती, विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी आणि उपलब्ध साधनसामग्री जवळपास सारखीच असण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे, एका शिक्षकाने वर्गात यशस्वीपणे वापरलेली एखादी पद्धत/ उपाय दुसऱ्या शिक्षकालाही लगेच उपयोगी पडू शकते.
- त्यामुळे शिक्षण परिषदेमध्ये शिक्षक आपल्या वर्गातील विशेष आव्हानांवर चर्चा करतात आणि एकत्र येऊन ठोस उपाय शोधतात तेव्हा हे उपाय थेट त्यांच्या परिस्थितीला लागू पडणारे असतात.
- राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवर झालेल्या प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान आणि नवीन पद्धती शिक्षक शिक्षण परिषदेत एकत्र येऊन प्रत्यक्ष वर्गात कशा वापराव्यात हे ठरवतात. यामुळे शिकण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि व्यावहारिक बनते.

शिक्षक जेव्हा एकत्र येऊन समस्यांवर काम करतात आणि एकमेकांना मदत करतात, तेव्हा त्यांच्यामध्ये 'आपण मिळून विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती साधू शकतो' असा विश्वास निर्माण होतो. शिक्षकांच्या शिकवण्याच्या पद्धतीत सुधारणा होते आणि विद्यार्थ्यांना अध्ययन निष्पत्ती प्राप्त होण्यास मदत होते. हा सामूहिक आत्मविश्वास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वात महत्त्वाचा घटक मानला जातो.

जगातील अनेक देशांमध्ये आणि शिक्षण प्रणालींमध्ये शिक्षकांसाठी अशा प्रकारच्या सामूहिक कामाची व्यवस्था आहे. एकमेकांची वर्गप्रक्रिया पाहणे आणि व्यावसायिक विकास बैठकांमध्ये सहभागी होणे ही शिक्षकांच्या क्षमता बांधणीसाठी आवश्यक अशी पद्धत आहे. शिक्षण परिषदेत याच पद्धतींना नियमित आणि सोपे रूप दिले जाते.

*Walia, P., Dutt, S., & Upadhyay, G. C. (२०२२). Continuous Professional Development: A Road Map for Teacher Education in India in the Context of NEP २०२०. International Journal of Research and Analytical Reviews (IJRAR), ९(२), १६०–१६६. https://www.ijrar.org/IJRAR२२A१३३२.pdf*

*Goddard, R. D., Hoy, W. K., & Woolfolk Hoy, A. (२०००). Collective teacher efficacy: Its meaning, measure, and impact on student achievement. American Educational Research Journal, ३७(२), ४७९–५०७. https://doi.org/१०.३१०२/०००२८३१२०३७००२४७९*

*OECD. (२०२०). TALIS २०१८ Results (Volume I): Teachers and School Leaders as Life-long Learners. OECD Publishing, Paris. https://doi.org/१०.१७८७/१d०bc९२a-en*

# शिक्षण परिषदेतील सत्रे

शिक्षण परिषदांमध्ये शैक्षणिक बाबींवरच चर्चा होऊन समस्या निराकरणार्थ दिशादर्शन मिळावे, या स्वरूपात सत्र नियोजन पुढीलप्रमाणे देण्यात आले आहे.

| सत्राचे नाव | वेळ | सत्रात काय करावे |
|---|---|---|
| **सत्र पहिले** - मागील महिन्याचा आढावा | ४५ मिनिटे | मागील महिन्यात आपल्या वर्गात काय झाले, कोणत्या अडचणी आल्या, कोणत्या लक्षणीय गोष्टी दिसल्या याचे पुनरावलोकन करावे. |
| **सत्र दुसरे** - विचारांची/ अनुभवांची देवाण-घेवाण | ४५ मिनिटे | आधीच्या सत्रातील चर्चेवरून शिक्षकांनी वर्गात येणाऱ्या समस्यांवर एकत्रितपणे उपाय शोधावे आणि आपल्या वर्गातील अनुभवांची एकमेकांसोबत देवाण-घेवाण करावी. |
| **सत्र तिसरे** - आशयाच्या आधारे पाठांचे मासिक नियोजन | १ तास ३० मिनिटे | पुढील महिन्यासाठी वर्गाचे नियोजन करावे, त्यासाठी अध्ययन निष्पत्ती निवडून त्यातून कोणता आशय पोहोचवायचा आहे हे स्पष्ट मांडावे, त्याला अनुसरून वर्गात गटातील काम कसे असेल, कोणते शैक्षणिक साहित्य कधी वापरता येईल याचे तपशीलवार नियोजन करावे. |
| **सत्र चौथे** - पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि समुदाय सहभाग | ३० मिनिटे | शाळा व्यवस्थापन समिती, शैक्षणिक ग्रामसभा आणि पालकसभा बैठकांचे आणि या घटकांचा मुलांच्या शिकण्यात सहभाग कसा मिळवता येईल यादृष्टीने नियोजन करावे. |
| **सत्र पाचवे** - राज्य/ जिल्ह्याचे विषय | ३० मिनिटे | राज्य/ जिल्ह्याकडून आलेली महत्त्वाची माहिती आणि धोरणे शिक्षकांपर्यंत पोहोचवावी. |
| **एकूण** | **४ तास** | |

यातील प्रत्येक सत्रात समूह साधन केंद्र समन्वयकांनी काय करावे हे पुढे दिले आहे.

६

# सत्र पहिले

कालावधी: ४५ मिनिटे

## मागील महिन्याच्या शिकण्या-शिकवण्याचा आढावा

### सत्राचा उद्देश

**शिक्षकांनी आपल्या दैनंदिन कामातून थोडा वेळ काढून स्वत:च्या शिकवण्याच्या प्रक्रियेचे पुनरावलोकन करावे हा या सत्राचा उद्देश आहे. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधनातून चिंतन करणे हे व्यावसायिक विकासाचे एक प्रभावी साधन मानले आहे. चिंतनशील सरावामुळे मुलांच्या प्रगतीनुसार शिक्षकांच्या वर्गप्रक्रियेमध्ये नेमकेपणा येत जातो आणि त्यांच्या व्यावसायिक क्षमता विकसित होतात.**



### सत्रात काय करावे?

- प्रत्येक शाळेने २-२ मिनिटांच्या वेळात शाळेतील एक लक्षणीय बाब आणि एक समस्या सांगावी. या दोन्ही गोष्टी मुलांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेशी निगडीत असाव्या.
- मागील महिन्यात ठरवलेल्या अध्ययन निष्पत्तींची सध्याची स्थिती काय आहे, किती मुलांना कोणत्या क्षमता प्राप्त झाल्या आहेत आणि कुठे मदतीची गरज आहे, हे समूह साधन केंद्र समन्वयकांनी तपासावे.
- केंद्रातील सर्व शाळांची लक्षणीय बाब आणि समस्या, समूह साधन केंद्र समन्वयकांनी किंवा केंद्र संसाधन गटातील शिक्षकांनी एका फळ्यावर किंवा तक्त्यात नोंदवून घ्यावी.
- मूल्यमापनाच्या कोणत्या पद्धती वापरल्या जात आहेत व त्यातून काय निदर्शनास येत आहे हे समजून घ्यावे.

## लक्षात ठेवायच्या गोष्टी

- प्रत्येक शिक्षकाने मागील महिन्यातील स्वतःच्या वर्गाचे नियोजन, मुलांकडून मिळालेला प्रतिसाद, काही सकारात्मक बाबी आणि समोर आलेल्या समस्यांची तयारी करावी.
- आपण आखलेले उपक्रम ठरल्याप्रमाणे झाले का, मुलांना त्या उपक्रमातून किती समजले आणि कोणत्या अडचणी आल्या यावर चर्चा करावी.
- संपूर्ण आढावा केवळ तोंडी माहितीवर न घेता, मुलांच्या शिकण्याशी संबंधित संख्यात्मक माहितीच्या (quantitative data) आधारे घेतला जाईल याची खात्री समूह साधन केंद्र समन्वयकांनी करावी.
- शिक्षकांना आपल्या वर्गात येणाऱ्या अडचणींवर स्वतः चिंतन करण्याची संधी द्यावी.
- संपूर्ण केंद्राचे चित्र उभे राहिल्याने पुढे जाऊन समूह साधन केंद्र समन्वयकांना केंद्राचे उद्दिष्ट आणि आत्तापर्यंत झालेली कामगिरी ठरवायला मदत होते. तसेच ही माहिती पुढे तालुका पातळीवर मांडता येते.
- शिक्षण प्रक्रियेचे मूळ उद्दिष्ट 'प्रत्येक मूल शिकणे' हे आहे. त्यासाठी प्रत्येक मुलाला अपेक्षित क्षमता प्राप्त होत आहेत का? हे सातत्याने बघणे आवश्यक आहे. किती मुलांना कोणत्या क्षमता प्राप्त झाल्या आहेत? काही ठराविक क्षमतांमध्ये खूप मुलांना मदतीची गरज भासते आहे का? अशी सर्व माहिती या आढाव्यातून समोर येणे अपेक्षित आहे. त्यातूनच मुलांच्या शिकण्याची वस्तुस्थिती समजते व पुढे जाऊन नेमके नियोजन करता येते.



## केंद्रस्तरीय शिक्षण परिषद

प्रास्ताविक, स्वागत, राष्ट्रगीत, राज्यगीत

मागील महिन्याचा आढावा - <नाव>

देवाण-घेवाण - <नाव>

अध्ययन निष्पत्ती आधारे पाठांचे मासिक नियोजन - <नाव>

पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि समुदाय सहभाग - <नाव>

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा - <नाव>

माझी नोंद - <नाव>

NAS आधारित SAS - <नाव>

विद्यांजली पोर्टल - <नाव>

महावाचन अभियान - <नाव>

शिक्षक लेखकांचे लेखन संग्रह - <नाव>

समारोप

→ नंतर

## केंद्रस्तरीय शिक्षण परिषद

प्रास्ताविक, स्वागत, राष्ट्रगीत, राज्यगीत

सत्र १ मागील महिन्याचा आढावा - लक्षणीय ठळक गोष्ट / समस्या

सत्र २ विचारांची/ अनुभवांची देवाण-घेवाण - <नाव>

सत्र ३ आशयाच्या आधारे पाठांचे मासिक नियोजन -<नाव>

सत्र ४ पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि समुदाय सहभाग -<नाव>

सत्र ५ राज्य/ जिल्ह्याचे विषय -

१) PAT - २ चाचणी विश्लेषण - <नाव>

२) कोडिंग प्रशिक्षण - <नाव>

३) NAS आधारित SAS - <नाव>

४) नवोपक्रम स्पर्धा सहभाग - <नाव>

समारोप



९





90

# सत्र दुसरे

कालावधी: ४५ मिनिटे (सादरीकरण वगळून)

## विचारांची / अनुभवांची देवाण - घेवाण

**पूर्वतयारी**

वरील समस्यांशी निगडीत जर काही सादरीकरण असेल तर त्याची तयारी करावी.

**सत्राचा उद्देश**

हे दुसरे सत्र पहिल्या सत्राच्या चिंतनावर आधारित आहे. या सत्राचा मुख्य उद्देश, शिक्षकांनी एकत्र येऊन वर्गात येणाऱ्या समस्यांवर उपाय शोधणे आणि आपल्या वर्गातील अनुभवांची एकमेकांसोबत देवाण घेवाण करणे हा आहे.

### सत्रात काय करावे?

या सत्रात शिक्षक/ विशेष साधन व्यक्ती आणि समूह साधन केंद्र समन्वयक यांनी एकत्र येऊन -

- मागील महिन्यात आलेल्या समस्यांवर, विशेषतः मुलांना शिकण्यात येणाऱ्या अडचणी आणि आपल्या शिकवण्याच्या पद्धतीतील बारकावे यावर चर्चा करावी.
- समस्या सोडविण्यासाठी वापरलेले सोपे आणि प्रभावी उपाय शिक्षकांनी एकमेकांना सांगावे. उदा - बहुवर्ग अध्यापनासाठी वापरलेल्या वेगवेगळ्या पद्धती, मुलांच्या भावनात्मक विकासाशी संबंधित मुद्दे कसे हाताळावे, किंवा कठीण वाटणारे विषय अथवा संकल्पना सोप्या कशा कराव्या.
- समस्यांशी निगडीत जर काही सादरीकरण असेल तर ते घ्यावे. त्याचबरोबर समूह साधन केंद्र समन्वयकांनी मांडलेल्या समस्यांवरसुद्धा चर्चा व्हावी.
- एखादी समस्या सत्रात सहभागी झालेल्या बऱ्याच शिक्षकांना भेडसावते आहे असे लक्षात आले तर त्यावर खालीलप्रमाणे काम करता येईल. तपशीलवार विश्लेषण करत गेल्यास शिक्षकांना समस्येवर आणि आपल्या वर्गप्रक्रियेवर चिंतन करण्यास मदत होते. त्याचा पुढे वर्गप्रक्रिया सुधारण्यास फायदा होऊ शकतो.

| महिना | समस्या | समस्येचे नेमके स्वरूप | विद्यार्थ्यांच्या कामाचे नमुने | समस्येचे विश्लेषण |
|---|---|---|---|---|
| नोव्हेंबर | गणिती क्रिया | **शाब्दिक उदाहरणे अर्थ आकलन** | "राहुलकडे १५ आंबे आहेत, त्याने ७ आंबे खाल्ले. त्याच्याकडे किती आंबे उरले आहेत?" - या प्रश्नातील 'उरले' या शब्दाचा अर्थ समजत नाही. अर्थ वरवर माहित असेल तरीही उदाहरणामध्ये नेमकी कोणती क्रिया करावी हे समजत नाही. | • वाचन आणि उदाहरणातील वापरल्या जाणाऱ्या भाषेचे आकलन:<br>शाब्दिक उदाहरणातील वापरलेले शब्द वाचून त्यांचा अर्थ लावू शकत नाहीत, वाक्य समजू शकत नाहीत, विशिष्ट शब्दसंग्रह समजत नाहीत किंवा वाचनाच्या वेळी आत्मविश्वास किंवा एकाग्रता टिकवू शकत नाहीत.<br>• उदाहरण मुलांच्या विश्वाशी - परिसराशी संबंधित नसल्यामुळे त्याची कल्पना करता येत नाही.<br>जसे की - एखाद्या आदिवासी भागात पिझ्झाचे उदाहरण देऊन अपूर्णांक विचारणे.<br>• उदाहरण वस्तूरूपात डोळ्यासमोर न आल्यामुळे कोणती क्रिया करायची ते समजत नाही.<br>• संख्या-संकल्पना पुरेशी स्पष्ट नसल्यामुळे अथवा क्रिया नीट करता येत नसल्यामुळे चुका होतात.<br>वाचनात निपुणता असली तरी गणिती क्रियांमधील सहसंबंध न समजल्यामुळे मुलांना शाब्दिक उदाहरणे सोडविणे कठीण जाते. या मध्ये ' =' चिन्हाचा अर्थ न समजणे, दोन किंवा अधिक क्रिया असणाऱ्या उदाहरणांचा पायरी-पायरीने विचार मांडता न येणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.<br>**मुलांनी दिलेल्या उत्तराची प्रत्यक्ष जीवनातील अनुभवांशी सांगड घालणे कठीण वाटते जसे की - २८.५ मुलांमागे १ शिक्षक इत्यादी** |

## १२

## वर्ग प्रक्रियेसाठी सुचवलेले उपक्रम

कोणतीही गणितीय क्रिया शिकवताना, त्या क्रियेशी संबंधित मुलांचे गणितीय शब्दभांडार विस्तारणे महत्त्वाचे आहे. खालील तक्त्यामध्ये प्रत्येक क्रियेसाठी शक्य तितके गणितीय शब्द भरा, असा उपक्रम गणिती क्रियेचे पाठ शिकवते वेळी जरूर घ्यावा. खाली दाखविल्याप्रमाणे एका चार्ट पेपरवर तक्ता तयार करून तो वर्गात लावावा. संदर्भासाठी खाली एक रकाना भरून दिला आहे:

| बेरीज | वजाबाकी | गुणाकार | भागाकार |
|---|---|---|---|
| एकत्र<br>जोडले<br>बेरीज<br>वाढले<br>एकूण<br>एकत्रित<br>सर्व मिळून | | | |

विद्यार्थी असे शब्द कसे लक्षात ठेवतील? तसेच संदर्भ समजून कसे वापरतील?

» गटांमध्ये वाक्य तयार करणे किंवा शाब्दिक उदाहरणे तयार करण्याचे खेळ खेळणे. यामध्ये वेगवेगळे शब्द वापरले जातील पण क्रिया तीच असेल.

» वर्गात वेगवेगळ्या गणिती क्रियांशी संबंधित शब्दांचे कोपरे/ पोस्टर तयार करणे. नवीन शब्द शिकवल्यावर ते पोस्टरवर नोंदवणे. विद्यार्थ्यांना उदाहरण सोडविताना अशा पोस्टरचा संदर्भ घेण्यासाठी प्रोत्साहन देणे किंवा स्वतःचे उदाहरण पोस्टरवर जोडण्यासाठी सांगावे.

» उदाहरणे सोडवतानाही शाब्दिक गणिताचे रुपांतर व्यावहारिक भाषेतील उदाहरणात करणे आवश्यक आहे.

उदा. बाळूच्या एका खिशात ८ लाल गोळ्या व दुसऱ्या खिशात ९ हिरव्या गोळ्या होत्या, तर त्याच्याकडे एकूण किती गोळ्या होत्या?

हे उदाहरण सोडवताना ८ गोळ्यांसाठी पाटीवर एककाच्या घरात ८ सुटे घ्यायचे. तसेच एककाच्या घरात ९ गोळ्यांसाठी ९ सुटे आणखी घ्यायचे. ते दोन्ही एकत्र करायचे. म्हणजे आपण बेरीज करत आहोत असे पाहून अंकातली बेरीज मांडून घ्यायची आणि उदाहरण सोडवायचे.

गणिती भाषेत मांडणी करणे प्रत्येकाला जमू लागल्यानंतर काही उदाहरणे गृहपाठासाठी देता येतील.

## लक्षात ठेवायच्या गोष्टी

- आढावा घेऊन झाल्यावर शिक्षकांना जाणवलेल्या समस्यांवर जास्त भर द्यावा. प्रत्येक समस्येवर सखोल चर्चा व्हावी.
- मागील महिन्याच्या अध्ययन निष्पत्तीच्या नियोजनाला धरून एखाद्या क्षमतेसाठी शिक्षकांनी वर्गात मुलांना काय काम दिले होते आणि ते मुलांनी कसे केले आहे याचे नमुने शिक्षकांना शिक्षण परिषदेमध्ये दाखवण्यास आणायला सांगावे. त्यामुळे प्रत्यक्ष काम बघून, चर्चेच्या माध्यमातून सुधारणेला संधी मिळून इतरांनाही दिशादर्शक उदाहरण राहील. तसेच त्यांना येणाऱ्या नेमक्या अडचणींवर उपाय सापडू शकतात. त्याची नियोजन करताना मदत होऊ शकते.
- यामध्ये केवळ वर्गाबद्दलच नव्हे, तर विषयज्ञान वाढवणे, वर्गातील विद्यार्थ्यांची वर्तणूक समजून घेणे आणि पालकांना मुलांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये सहभागी करून घेणे यांसारख्या इतर मुद्द्यांवरही चर्चा व्हावी.
- शिक्षण परिषद केवळ एकतर्फी न राहता, ती संवादात्मक व्हावी. यासाठी मुलाखत किंवा गटचर्चा यांसारख्या पद्धतींचा वापर करावा. यामुळे कमी बोलणारे शिक्षकही आपले विचार मांडू शकतील आणि त्यांचे काम समजून घेता येईल.

**“शिक्षण परिषदेत शाळांना एकमेकांच्या समस्या आणि त्यावरचे उपाय समजून घ्यायला मदत होते. एखादी शाळा एखाद्या बाबतीत कमी पडत असेल तर दुसरी त्या बाबतीत चांगलं काम करणारी शाळा तिथे मदत करू शकते.” - श्री. कपिल सोनकांबळे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद शाळा कुसेगाव, वाडीवऱ्हे, इगतपुरी, नाशिक**

# सत्र तिसरे

कालावधी: १ तास ३० मिनिटे

## आशयाच्या आधारे पाठांचे मासिक नियोजन

**पूर्वतयारी -**

शिक्षण परिषदेला येताना मासिक नियोजनाचा फॉरमॅट व पाठ्यपुस्तके घेऊन यावीत.

**सत्राचा उद्देश**

आशय वापरून मासिक नियोजन तयार करण्यास शिक्षकांना मदत करणे हा या सत्राचा उद्देश असावा. यामागे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे हा हेतू नसून, पाठांचे नियोजन अधिक प्रभावीपणे कसे करावे, ते अध्ययन निष्पत्तीशी कसे जोडावे आणि वर्गात शिकवल्या जाणाऱ्या गोष्टी मुलांच्या प्रत्यक्ष जीवनाशी कशा जोडाव्या हा आहे.

मासिक नियोजन केल्याने वर्गप्रक्रिया अधिक हेतुपूर्ण होते. यातून शिक्षकांना कोणत्या महिन्यात कोणता आशय निवडायचा, मुलांच्या कोणत्या क्षमता विकसित व्हायला हव्यात आणि संकल्पनांची सखोल समज तयार होण्यासाठी विविध उपक्रमांची रचना कशी करायची, याचा स्पष्ट आराखडा मिळतो. ऐनवेळी नियोजन करण्याची घाई टाळता येते आणि केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापेक्षा अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यावर वर्गप्रक्रिया केंद्रित होते.

आशय वापरून नियोजन केल्याने वर्गप्रक्रिया मुलांच्या रोजच्या जीवनाशी जोडली जाते आणि रंजक होते. 'आपल्या आजुबाजूचा परिसर', 'सण' किंवा 'स्थानिक बाजार' अशी रोजच्या जगण्याशी संबंधित आशयाची काही उदाहरणे आहेत. उदा. 'आपला परिसर' या आशयामध्ये गणित (बाजारातील वस्तू मोजणे), भाषा (परिसराचे वर्णन करणे), परिसर अभ्यास (आपल्या परिसरातील समाजसेवक) आणि कला (परिसराचे चित्र काढणे) या विषयांना एकत्र जोडता येते.

## सत्रात काय करावे?

हा बैठकीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. यामध्ये पुढील महिन्याचे अध्ययन निष्पत्ती आधारित नियोजन करावे.

- शिक्षकांचे इयत्तेनुसार गट करून त्यांना आपल्या वर्गाचे नियोजन त्या गटात मांडायला सांगावे. गटातील सदस्यांसोबत त्यांना त्याबाबत सविस्तर चर्चा करायला सांगावी.
- नियोजन करताना प्रथम पाठ निवडावे. ते पूर्ण वाचावे. मग त्यातून एक आशय ठरवावा.
- संकल्पना नकाशा (concept map) तयार करावा.
- त्यानंतर पाठाला लागू होणाऱ्या अध्ययन निष्पत्ती निवडाव्या.
- निवडलेल्या अध्ययन निष्पत्तीची फोड करावी.
- अध्ययन निष्पत्ती निवडताना व त्यांची फोड करताना त्यांचा क्रम लक्षात घेणे आवश्यक आहे.
- त्यानंतर वर्गप्रक्रियेचा विचार करताना एकत्र गट सत्रासाठी, गटातील कामासाठी उपक्रम निवडावे.
- वैयक्तिक सरावासाठी वर्कशीट किंवा प्रकल्प ठरवावे.
- वर्गप्रक्रियेत झालेल्या कामावर व अध्ययन निष्पत्तीवर आधारित मूल्यमापन कसे केले जाईल हे ठरवावे.
- नियोजन करताना वर्गप्रक्रियेत लागणाऱ्या शैक्षणिक साहित्याचाही विचार करावा.
- हे नियोजन पूर्ण करताना पालकांची कशी मदत घेता येईल हेदेखील ठरवावे.
- मग गटांच्या प्रतिनिधींनी या नियोजनातील पाठ - आशय - अध्ययन निष्पत्ती - अध्ययन निष्पत्तीची फोड - वर्गप्रक्रियेतील उपक्रम - मूल्यमापन -पालकांचा सहभाग या गोष्टी सर्व गटांसमोर मांडाव्या. शिक्षकांनी मांडलेल्या उद्दिष्टांवर (निष्पत्ती आणि इतर) चर्चा करावी.
- नियोजनाचा संपूर्ण भर क्षमता आधारित शिक्षणावर असेल याकडे समूह साधन केंद्र समन्वयकांनी लक्ष द्यावे.

### लक्षात ठेवायच्या गोष्टी


- एका महिन्यासाठी एकच आशय निश्चित केला जावा.
- शिक्षक एकमेकांशी चर्चा करून आशय निवडतील याकडे लक्ष द्यावे.
- शैक्षणिक संसाधनांचा वापर करताना त्यामागे एखादा उपक्रम अधिक अर्थपूर्ण करणे आणि मुलांचा सक्रिय सहभाग मिळविणे हा हेतू असावा.
- संबंधित अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी योग्य उपक्रमांची निवड केली जावी. तसेच ते उपक्रम मुलांच्या अनुभवाशी जोडलेले असावेत.
- आशय, उपक्रम आणि शैक्षणिक संसाधने यांचा थेट संबंध अध्ययन निष्पत्तीशी तसेच मुलांच्या रोजच्या जीवनाशी जोडलेला असावा.
- उपलब्ध माहितीचे सुयोग्य संकलन व काटेकोर विश्लेषण केलेले असावे. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाला आपल्या वर्गातील प्रत्येक मुलाची शिकण्याची वाटचाल समजते. मुलांची विषयवार क्षमतेची सद्यस्थिती कळते.


*"आमच्या केंद्रात शिक्षक शिक्षण परिषदेमध्ये नियमित मासिक नियोजन करतात, त्यांच्यात अनुभवांची देवाणघेवाण होते व मागील महिन्याचा आढावा नेमकेपणाने होतो. नियोजन करताना शिक्षक इयत्तानिहाय विचार करतात. अध्ययन निष्पत्ती व त्यावर आधारित उपक्रम काढून हा घटक शिकवण्यासाठी अजून कोणत्या नवीन बाबी आपल्याला लागतील याची चर्चा करतात. अशा पद्धतीने केलेले महिन्याचे नियोजन शिक्षक वर्गात घेऊन जातात. शिक्षण परिषद एक दिवसाची प्रक्रिया नसून ती पूर्ण महिनाभर वर्गप्रक्रियेत मदत करत राहील यासाठी प्रयत्न केला जातो. या महिनाभरात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन दिले जाते. काही कमतरता असतील तर त्याबाबत मार्गदर्शन केले जाते." - मनिषा रामकृष्ण सोनवणे, रिंगणगाव, एरंडोल, जळगाव*



| शाळा | इयत्ता | उपक्रम | विषय | समस्या |
|---|---|---|---|---|
| शाळा १ | ४ थी | नियमित श्रुतलेखन | भाषा | - |
| | | नाणी नोटांचा वापर करून भागाकार | गणित | - |
| शाळा २ | ३ री | अक्षर कार्डाचा वापर | भाषा | विरामचिन्हयुक्त लेखन नाही |
| शाळा ३ | २ री | -शब्द संगीत (लेखन)<br>-शब्द साखळी | भाषा | |
| | ५ वी | शिष्यवृत्ती | | निकालाची टक्केवारी |
| शाळा ४ | ५ वी | शिष्यवृत्तीच्या उत्तरपत्रिकेतील ० भरण्याचा सराव<br>गणिताच्या क्लृप्त्या शिकवणे गतीने उत्तर काढण्यासाठी विविध सूत्रांचा वापर करणे | | |
| | ४ थी | पालकांना विद्यार्थ्यांची गुणवत्ता प्रत्यक्षात दाखवणे | | |








१९

# सत्र चौथे

कालावधी: ३० मिनिटे

## पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि समुदाय सहभाग

### सत्राचा उद्देश

**शाळा व केंद्रामध्ये पालक, शाळा व्यवस्थापन समिती (SMC) आणि स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग वाढवणे हा या सत्राचा मुख्य उद्देश असावा. मुलांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पालक व समुदायाची साथ महत्त्वाची आहे.**

### सत्रात काय करावे?

- शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करणे आवश्यक असेल तर त्याचे नियोजन करावे.
- शाळा व्यवस्थापन समितीच्या मासिक बैठकीचे विषय ठरवावेत. या बैठकीत मुलांच्या शिकण्याच्या गुणवत्तेला प्राधान्य देणारे मुद्दे चर्चिले जातील याकडे लक्ष द्यावे.
- प्रत्येक वर्गातील पालकांशी थेट संवाद साधण्यासाठी वर्गनिहाय शिक्षक-पालक सभेचे नियोजन करावे.

## लक्षात ठेवायच्या गोष्टी

- पालक आणि समुदाय सहभागाचे महत्त्व अधोरेखित करणारा छोटा संवाद वापरून हे सत्र घेता येईल.
- शाळेच्या विकासात पालक किंवा ग्रामस्थांचा सहभाग कमी पडत असेल तर त्यामागच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करावा.
- पालकसभा, शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीतील विषय, समुदाय उपक्रम यावर एकमत घडवून आणण्याचा प्रयत्न करावा.
- एखाद्या शाळेने केलेले यशस्वी काम सादर करून इतर शाळांना ते कसे अमलात आणता येईल यावर चर्चा करावी.



२९

# सत्र पाचवे

कालावधी: ३० मिनिटे

## राज्य/ जिल्ह्याचे विषय

### सत्राचा उद्देश

**या सत्राचा मुख्य उद्देश राज्य/ जिल्ह्याकडून आलेली महत्त्वाची माहिती आणि धोरणे शिक्षकांपर्यंत पोहोचवणे तसेच दिवसभर झालेल्या चर्चेचा शिक्षकांना त्यांच्या वर्गासाठी कसा उपयोग होईल, हे निश्चित करणे हा असावा.**

### सत्रात काय करावे?

- **राज्य/ जिल्ह्याकडील विषयांवर माहिती**: राज्यस्तरावरून किंवा जिल्हास्तरावरून आलेल्या नवीन उपक्रमांबद्दल, धोरणांबद्दल आणि इतर महत्त्वाच्या विषयांबद्दल माहिती दिली जावी. यामुळे सर्व शिक्षकांना एकाच वेळी अद्ययावत माहिती मिळते.
- **सत्राचा समारोप आणि अभिप्राय**: बैठकीच्या शेवटी, समूह साधन केंद्र समन्वयकांनी काही प्रश्नांच्या माध्यमातून शिक्षकांना दिवसभराच्या बैठकीविषयी प्रतिक्रिया विचाराव्यात. उदा -
  - » आजच्या शिक्षण परिषदेतून तुम्हाला वैयक्तिकरित्या काय शिकायला मिळाले?
  - » आजच्या चर्चेतील कोणत्या गोष्टींचा वापर तुम्ही तुमच्या वर्ग नियोजनामध्ये करणार आहात?
  - » आजच्या सत्रातील कोणती गोष्ट तुम्हाला स्वत:ला आवडली?
  - » आजच्या सत्रात तुम्हाला कोणती नवीन माहिती मिळाली?

### लक्षात ठेवायच्या गोष्टी

- केवळ झालेल्या चर्चेची उजळणी न करता, त्या चर्चेचा उपयोग वर्गात कसा करता येईल, यावर विचार करण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहन द्यावे. त्यामुळे शिक्षकांना झालेल्या चर्चेची वर्गप्रक्रियांशी सांगड घालायला मदत होते.
- शिक्षकांनी दिलेल्या उत्तरांवरून त्यांनी शिकलेल्या गोष्टी प्रत्यक्ष वापरात आणण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयकांनी मार्गदर्शन करावे. यामुळे शिक्षण परिषदेतील सहभाग अधिक अर्थपूर्ण बनतो.




२३

# शिक्षण परिषदेचा कृती कार्यक्रम

**शिक्षण परिषदेचा शिक्षकांना खरोखर उपयोग व्हायला हवा असेल आणि प्रत्येक मूल शिकावे हे अंतिम ध्येय साध्य व्हायला हवे असेल तर परिषदेच्या आधीची तयारी, प्रत्यक्ष परिषदेचे नियोजन, नंतरच्या शाळाभेटी आणि शाळा व्यवस्थापन समिती व शैक्षणिक ग्रामसभा या समुदाय सहभागाच्या प्रक्रियांचे केंद्र पातळीवर नियोजन होणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत.**

- शिक्षण परिषदेपूर्वी विषय पत्रिका ठरवणे, शिक्षण परिषदेची वेळ व ठिकाण ठरवणे हे काम समूह साधन केंद्र समन्वयकांनी करावे.
- शिक्षण परिषदेत शिक्षकांना नवीन गोष्टी शिकता याव्यात यासाठी आवश्यक पूर्वतयारी करावी. उदा. विषयांची निवड, तज्ज्ञ सुलभक इ.
- यामध्ये केंद्र संसाधन गटातील सदस्यांना बोलावणे, इतर तज्ज्ञ व्यक्तींची मदत घेणे अशा गोष्टी करता येतील.




२४

# शिक्षण परिषद प्रभावी होण्यासाठी



# समूह साधन केंद्र समन्वयकांची भूमिका

**केंद्र पातळीवर प्रभावी शिक्षण परिषदेसाठी समूह साधन केंद्र समन्वयकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण परिषद ही मुख्यतः शिक्षकांची सभा असून तिचा अंतिम उद्देश 'प्रत्येक मूल शिकावे' हा आहे.**

**या संपूर्ण प्रक्रियेमध्ये समूह साधन केंद्र समन्वयकांनी -**

- शिक्षक, तज्ज्ञ मंडळी, जिल्ह्यावरून आलेला कार्यक्रम, केंद्राचे नियोजन या विविध घटकांमध्ये एकवाक्यता आणण्याचे काम करावे.
- उपलब्ध संसाधनांचा वापर प्रभावीपणे कसा करता येईल याविषयी शिक्षकांना मार्गदर्शन करावे.
- शिक्षकांना आवश्यक संसाधने मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

**खालील गोष्टींवर भर द्यावा -**

- शिक्षण परिषदेचे नेतृत्व करणे.
- शिकवण्याच्या प्रक्रियेतील आव्हानांना तोंड देण्यासाठी शिक्षकांना तयार करणे.
- त्यांना नियमित मदत करण्याकरिता उपलब्ध असणे.
- ठराविक काळाने मुलांच्या प्रगतीचा मागोवा घेणे.
- त्यासाठी केंद्रातील शाळानिहाय दस्तऐवज ठेवणे.




२६

जसजशी शिक्षण परिषद प्रक्रिया आणि समूह साधन केंद्र समन्वयकांची भूमिका परिपक्व होत जाईल तसतशी समूह साधन केंद्र समन्वयकांच्या भूमिकेत बारकाई येत जाते आणि त्यांना खालील गोष्टींकडे अधिक लक्ष देता येते -

- शिक्षकांना स्वतःच्या क्षमता वाढवण्यासाठी, शिकण्याच्या नवनवीन पैलूंची ओळख करून घेण्यासाठी वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून देणे,
- शिकवण्याच्या प्रक्रियेतील आव्हांनाना तोंड कसे देता येईल याविषयी नवीन विचार सादर करणे,
- शिक्षकांनी एकत्रित शिकावे याकरिता नवीन मार्ग शोधणे,
- प्रत्येक शाळेच्या गरजेनुसार केंद्रस्तरावर सर्वसमावेशक नियोजन तयार करणे,
- त्या नियोजनाची अंमलबजावणी होत आहे याची खबरदारी घेणे,
- शिक्षकांचे शिकणे अधिक समृद्ध व्हावे या उद्देशाने नियोजन करताना केंद्रस्तराच्या पलिकडे जाऊन विचार करणे,
- शिकण्या-शिकवण्याची एखादी पद्धत कशी अंमलात आणावी हे आपल्या कामाच्या आवाक्याबाहेर जाऊन मांडता येणे, त्या बाबतीत नवीन जबाबदाऱ्या घेणे,
- आहे त्या परिस्थितीत आणि संदर्भानुसार कोणतेही संसाधन निवडून शिक्षकांना त्याचा वापर करता येईल अशी व्यवस्था तयार करणे.

**दरमहा केंद्र संसाधन समूहाची होणारी बैठक हा शिक्षण परिषद प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग आहे. शिक्षण परिषदेआधी होणाऱ्या केंद्र संसाधन गटाच्या बैठकीत डायटकडून आलेल्या शिक्षण परिषद अजेंडावर चर्चा करून, आपल्या केंद्राच्या गरजेनुसार त्यात आवश्यक ते बदल करण्याचे काम समूह साधन केंद्र समन्वयकांचे आहे. तसेच या बैठकीत केंद्रातील शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठका आणि शैक्षणिक ग्रामसभांचे नियोजन केले जात आहे याकडे समूह साधन केंद्र समन्वयकांनी लक्ष द्यावे.**

शिक्षण परिषदेच्या आधीची तयारी आणि नंतरचा कृती कार्यक्रम व्यवस्थित असेल तर ही प्रक्रिया अधिक बळकट होते. या प्रक्रियेमध्ये समूह साधन केंद्र समन्वयकांनी कोणती दक्षता घ्यावी हे पुढे दिले आहे.

# केंद्र संसाधन गटाची भूमिका

**शिक्षण परिषद प्रक्रिया व केंद्रातील गुणवत्ता वाढ यामध्ये केंद्र संसाधन गटाची विशेष भूमिका आहे. केंद्र संसाधन समूह हा काही स्वयंप्रेरित आणि उपक्रमशील शिक्षकांचा गट असतो. प्रभावी शिक्षण परिषदांसाठी केंद्र संसाधन समूह सक्रीय असणे गरजेचे आहे.**



### या गटासाठी केंद्रातून शिक्षकांची निवड करताना -

- स्थानिक परिस्थितीनुसार शाळानिहाय किंवा विषयनिहाय निवड करावी.
- शाळानिहाय निवड - केंद्रातील प्रत्येक शाळेतून एक शिक्षक प्रतिनिधी असावा.
- विषयनिहाय निवड - भाषा, इंग्रजी, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि ICT या सहा विषयांसाठी प्रत्येकी दोन कृतीशील शिक्षक निवडावेत.
- ज्या शिक्षकांचा या विषयांचा चांगला अभ्यास आहे, ज्यांनी स्वतःच्या वर्गात व शाळेमध्ये शिकवताना नाविन्यपूर्ण प्रयोग करून मुलांची क्षमता वाढवली आहे असे शिक्षक निवडावेत.
- केंद्रातील शिक्षक व शाळा यांचे गुणोत्तर प्रमाण व स्थानिक परिस्थिती यानुसार शिक्षकांची संख्या ठरवावी.

### केंद्र संसाधन गटातील शिक्षकांना -

- क्षमता म्हणजे काय आणि त्या प्राप्त होण्यासाठी कसे नियोजन करावे याची समज असते.
- क्षमता आधारित शिक्षणामध्ये मूल्यमापनाचा आणि डेटा आधारित नियोजनाचा उद्देश काय आहे याची उत्तम जाण आलेली असते.

**केंद्र संसाधन गटातील शिक्षकांनी -**

- केंद्रातील शिक्षकांनी मांडलेल्या समस्या स्वतःच्या वर्गातील अनुभवाशी जोडून चर्चेच्या माध्यमातून उत्तरे शोधावी.
- आपण स्वतः वर्गात राबवीत असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम इतर शिक्षकांसमोर सादर करावे किंवा शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून ते प्रत्यक्ष सादर करून दाखवावे.
- शिक्षकांना प्रत्यक्ष शिकवताना आवश्यक मदत करण्याचे काम करावे.

**महिन्याच्या शेवटी सर्वांची शाळाभेट, वर्ग निरीक्षणे एकत्र करून, केंद्राचे शैक्षणिक विश्लेषण समोर ठेवून केंद्रातील गरजा व क्षमता विकसनाच्या दृष्टीने मुलांसोबत ज्या क्षमतांवर काम करण्याची आवश्यकता आहे त्या ओळखणे व त्यानुसार केंद्राचे पुढील नियोजन आणि योजना ठरवणे हे काम केंद्र संसाधन गटाचे आहे. त्या दृष्टीने शिक्षण परिषदेचे नियोजन करण्याचे काम हा गट करतो.**

**केंद्र संसाधन गटाची स्थापना करणे, त्यांच्या नियमित बैठकांमधून केंद्राच्या गुणवत्ता वाढीची दिशा व उद्दिष्टे निश्चित करणे यासाठी समूह साधन केंद्र समन्वयकांनी पुढाकार घ्यावा.**



# शाळाभेटी

**योग्य पूर्वतयारी, नियोजन व सर्वांच्या सक्रीय सहभागाला वाव देणारी शिक्षण परिषद हा शिक्षकांना समृद्ध करणारा, कामाला दिशा देणारा, उत्साह वाढविणारा असा अनुभव असतो. शिक्षकांच्या या शिकण्याचा फायदा मुलांना व्हायला हवा. तो कसा होईल? - तर त्यासाठी परिषदेनंतर शिक्षक व समूह साधन केंद्र समन्वयक/ केंद्र संसाधन गट यांनी शाळाभेटी करणे महत्त्वाचे आहे. यामधून शाळा व वर्ग पातळीवर होणारे बदल नेमकेपणाने जाणून घेता येतात.**

### शाळाभेटींतून काही महत्त्वाच्या गोष्टी साध्य होतात -

- नियोजित गोष्टी राबवल्या जात आहेत का हे बघून काही अडचणी असल्यास मार्गदर्शन करता येते.
- शाळांमध्ये राबविले जाणारे नवीन उपक्रम, शैक्षणिक साहित्याचा अभिनव वापर, प्रयोगशील शिक्षकांचे वर्ग हे प्रत्यक्ष पाहता येते. यामुळे शिक्षकांना प्रोत्साहन मिळते.
- मुलांच्या क्षमतावाढीचा मुले व शिक्षकांसोबत आढावा घेता येतो.
- सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या नोंदी (उदा. विद्यार्थी संचयिका) बघून त्यात आवश्यकतेनुसार बदल सुचवता येतात.
- पुढील शिक्षण परिषदेची विषयपत्रिका ठरवण्यास मदत होते.





## ३०

**या शाळाभेटींमध्ये खालील गोष्टींच्या निरीक्षणावर भर द्यावा -**

- वर्गातील मुलांचे क्षमतेवर आधारित विभाजन केलेले आहे का?
- शिकणाऱ्या मुलाच्या गरजेनुसार शिक्षक त्याला शिकवत आहेत का?
- कोणतीही गोष्ट शिकवताना त्यातून आपण काय शिकणे अपेक्षित आहे हे शिक्षक मुलांना सांगत आहेत का?
- आपण नक्की काय शिकतो आहे हे स्वतःच्या शब्दात मांडण्यासाठी शिक्षक मुलांना तयार करत आहेत का?
- आपण काय शिकतो आहोत ते मुलांना स्वतःच्या शब्दांत मांडता येते आहे का?
- वर्गात कोणत्या रचनात्मक मूल्यांकन पद्धती वापरल्या जात आहेत?

**शाळाभेटींचा उद्देश हा शिक्षकांच्या, त्यांच्या शिकवण्यातल्या चुका काढणे नसून त्यांच्या अडचणींचे निवारण करणे, त्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी काय करता येईल हे बघणे असा आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा अंतिम उद्देश प्रत्येक मूल शिकले पाहिजे आणि त्यासाठी शिक्षकांची क्षमता बांधणी केली पाहिजे हा असावा.**

*धुळे येथील बोरकुंड केंद्राचे समूह साधन केंद्र समन्वयक श्री. अनिल वानखेडे म्हणतात, "शिक्षण परिषद ही एक दिवसाची प्रक्रिया नाही. खरी प्रक्रिया शिक्षण परिषदेनंतर वर्गात सुरू होते. त्यासाठी शाळाभेटींच्या माध्यमातून शिक्षकांना मदत केली जाते."*

# सनियंत्रण: जिल्हा व तालुका स्तर

**शिक्षण परिषद प्रक्रिया ही निरंतर चालू राहणारी असेल तर शिक्षकांचा व्यावसायिक विकास अखंड होत राहून त्याचा परिणाम वर्गप्रक्रियेवर आणि पर्यायाने मुलांच्या शिकण्यावर होताना दिसून येईल. जिल्हा, तालुका व केंद्र या स्तरावर शिक्षण परिषदेचे सनियंत्रण केल्यास या प्रक्रियेची अंमलबजावणी प्रभावी होऊन ती शाश्वत होईल.**

**यासाठी प्रत्येक स्तरावर पुढील कार्यवाही होणे गरजेचे आहे -**

## जिल्हा स्तर

१.जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी जिल्ह्यातील सर्व केंद्रावर दरमहा शिक्षण परिषद कधी व कोणत्या वेळेत होईल याबाबतचे नियोजन करून त्याप्रमाणे समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) यांना आदेशित करावे. याबाबत जिल्हा गुणवत्ता कक्ष बैठकीमध्ये चर्चा करावी.

२.जिल्ह्याची जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचे मार्फत दरमहा होणाऱ्या शिक्षण परिषदेतील शैक्षणिक विषयांच्या मार्गदर्शनाबाबत आवश्यकतेनुसार केंद्र समन्वयक व सुलभकांची ऑनलाइन /ऑफलाईन बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन करावे.

### प्रत्यक्ष शिक्षण परिषदेमध्ये

- सर्व शिक्षकांचा सहभाग कशा प्रकारे आहे?
- शिक्षण परिषदेत खालीलपैकी कोणत्या गोष्टी होतात -
  - » मागील महिन्याचा आढावा
  - » शिक्षकांच्या वर्गातील अध्यापन अनुभवांची देवाणघेवाण
  - » अध्ययन निष्पत्ती आधारित मासिक नियोजन
- मासिक नियोजन करताना विद्यार्थ्यांचा मूल्यमापन डेटा विचारात घेतला जातो का?
- शिकण्याची प्रक्रिया कशी चालते यावर विचारपूर्वक चर्चा करायला शिक्षण परिषदेदरम्यान शिक्षकांना पुरेसा वेळ मिळतो का?
- आपल्याला कुठे मदतीची गरज आहे हे स्वतः शिक्षकांना समजते आहे का?
- मासिक नियोजन करताना शिक्षकांचे आपसात सहकार्य कसे आहे?
- शिक्षक एकमेकांच्या समस्यांवर उपाय काढायचा प्रयत्न करतात का?

### वर्गप्रक्रियेमध्ये

प्रत्येक वर्गात त्या महिन्याच्या अध्ययन निष्पत्ती आणि संकल्पना यांची सांगड घातलेले नियोजन तयार केलेले आहे का?

### शिक्षक खालील गोष्टी करताना दिसतात का -

- आकारिक मूल्यमापन (पोर्टफोलिओ फाईल्स वापरुन)
- पिअर लर्निंग
- मुलांसोबत चर्चा/ विचारविनिमय
- गटकृती

**वर्गपाठाचे नियोजन केलेले आहे काय?**

**वर्ग अध्यापनातील अडचणी सोडविण्यासाठी सहकारी अथवा एखादी संसाधन व्यक्ती यांची मदत घेतली जाते काय?**

## तालुका स्तर

- गटशिक्षणाधिकारी यांनी तालुका स्तरावर दरमहा तालुका गुणवत्ता कक्षाची बैठक घेऊन तालुक्यातील सर्व केंद्रांच्या आणि शाळांच्या गरजा समजून घ्याव्या. या बैठकीत विस्तार अधिकारी आणि सर्व केंद्रांचे समूह साधन केंद्र समन्वयक यांचा सहभाग अपेक्षित आहे.
- तसेच या बैठकीत जिल्हा यंत्रणेकडून आलेले निर्णय तालुक्यातील केंद्र आणि शाळांपर्यंत पोचवावे.
- तालुक्यातील सर्व केंद्रांमध्ये दरमहा शिक्षण परिषदांचे आयोजन करावे. त्यामध्ये केंद्राच्या गरजेनुसार केलेल्या नियोजनाचा व जिल्ह्याच्या निर्णयांचा समावेश करावा.
- केंद्रांनी मांडलेल्या व स्वतःला जाणवलेल्या स्थानिक गरजांवर आधारित कार्यशाळेची जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) यांच्याकडे शिफारस करून त्यांचे आयोजन करावे.





३४

## नेहेमी विचारले जाणारे प्रश्न (FAQs)



### शिक्षण परिषद किती वेळाची असावी?

मधली जेवणाची वेळ वगळता शिक्षण परिषद किमान चार तास असावी. व्यवस्थित ५ सत्रांमध्ये नियोजन झाले तर किमान ४.०० तासात उत्तम पद्धतीने शिक्षण परिषद आयोजित करता येऊ शकते. उदा - दुपारी १२.०० ते ४.००

### शिक्षण परिषद कोणत्या दिवशी घ्यावी?

जिल्हा शिक्षण विभागाने दिलेल्या तारखेप्रमाणे शिक्षण परिषदांचे आयोजन करण्यात यावे.

### शिक्षण परिषदेच्या दिवशी शिक्षकांनी शाळा घेणे अपेक्षित आहे का?

होय. शिक्षकांनी सकाळची शाळा घेणे अपेक्षित आहे. आपल्या वरिष्ठांकडून आलेल्या सूचनांनुसार सकाळची शाळा घेऊन मग शिक्षण परिषदेला उपस्थित रहावे.

### शिक्षण परिषदेमध्ये प्रशासकीय विषयाला किती वेळ असावा?

प्रशासकीय विषय म्हणजे शाळानिहाय माहिती संकलन, प्रशासकीय सूचना, दस्तऐवज गोळा करणे, हे विषय शेवटच्या ३० मिनिटात घेतले तर अधिक प्रभावी होतात. हे विषय सुरुवातीला घेतले ते पूर्ण होण्यास जास्त वेळ लागून शिक्षण परिषदेतील इतर विषयांना वेळ कमी पडू शकतो. तसेच काही प्रशासकीय विषय तक्रारवजा असतील तर शिक्षण परिषदेचे वातावरण बिघडण्याची शक्यता असते.



## जिल्ह्यातील सर्व केंद्रातील शिक्षण परिषद एकाच दिवशी घ्यावी का?

शिक्षण परिषद एकाच दिवशी न घेता त्यासाठी जिल्ह्यात किमान तीन दिवस व कमाल एका आठवड्याचा कालावधी असावा. यामुळे केंद्र संसाधन गटाच्या बैठका नियमित आणि समूह साधन केंद्र समन्वयकांच्या उपस्थितीत होऊ शकतील. राज्यातील जवळपास प्रत्येक जिल्ह्यातील समूह साधन केंद्र समन्वयकांना एकापेक्षा जास्त केंद्रांची जबाबदारी असल्याने एकाच दिवशी जिल्ह्यातील सर्व केंद्रात शिक्षण परिषद झाल्यास त्यांना स्वतःच्या प्रत्येक केंद्राच्या शिक्षण परिषदेला उपस्थित राहणे शक्य होणार नाही.

## एखाद्या महिन्यात ठरलेल्या तारखेला काही कारणाने शिक्षण परिषद झाली नाही, तर ती पुन्हा कधी घ्यावी?

दर महिन्यात एकदा शिक्षण परिषद व्हायलाच हवी. एखाद्या महिन्यात ठरलेल्या तारखेला काही कारणाने शिक्षण परिषद झाली नाही, तर वरिष्ठांच्या परवानगीने ती इतर दिवशी घेता येईल.

## शिक्षण परिषदेचे नेतृत्व कोणी करावे ?

शिक्षण परिषदेचे नेतृत्व समूह साधन केंद्र समन्वयकांनी करावे.



## शिक्षण परिषदेचा अजेंडा कोणी आणि कधी तयार करावा?

शिक्षण परिषदेचा अजेंडा करण्याची जबाबदारी संबंधित समूह साधन केंद्र समन्वयकांची आहे. यासाठी ते केंद्र संसाधन गटातील शिक्षकांची मदत घेऊ शकतात. शिक्षण परिषदेच्या आधी केंद्र संसाधन गटाच्या बैठकीत शिक्षण परिषदेचा अजेंडा तयार करणे अपेक्षित आहे. केंद्राच्या गरजेनुसार आणि जिल्हा शिक्षण विभागाने पाठवलेल्या विषयांचा यासाठी आधार घेण्यात यावा.



## शिक्षण परिषदेचे नियोजन व विषय ठरवण्याचे अधिकार कोणाला असावेत?

शिक्षण परिषदेचे विषय व नियोजन या संदर्भात DIET व केंद्र यामध्ये समन्वय असावा. विषय निवडीमध्ये जिल्ह्याला २०% व केंद्राला ८०% अधिकार असावेत.

## केंद्रामध्ये शिक्षकांची संख्या जास्त असेल (४० पेक्षा जास्त) तर शिक्षण परिषद कशी घ्यावी?

अशा वेळी शिक्षण परिषद विभागून (वर्गनिहाय) घेता येईल. त्याबाबत केंद्र संसाधन गटातील शिक्षकांना विभागून जबाबदारी देता येईल.

## शिक्षण परिषदेला येताना शिक्षकांनी कोणती तयारी करून येणे अपेक्षित आहे?

१. आपण मागील महिन्यात केलेल्या नियोजनानुसार काम करताना वर्गात कोणत्या अडचणी आल्या? त्या लिहून आणाव्या.

२. मागील महिन्यात कोणत्या गोष्टी उल्लेखनीय झाल्या आहेत त्यांची माहिती सोबत आणावी. त्यासंबंधी काही फोटो / व्हिडिओ असतील तर ते पेनड्राइव्हमधून घेऊन यावेत.

३. वर्गात उपक्रम घेताना आपण एखादे विशेष शैक्षणिक साहित्य वापरले असेल, तर ते सोबत घेऊन यावे. जेणेकरून इतर शिक्षकांना ते दाखवता येईल आणि त्याबद्दल चर्चा करता येईल .

४. पुढील महिन्याचे नियोजन करण्यासाठी विहित नमुना कॉपीज सोबत ठेवाव्या.

५. आपली स्वत:ची वही / डायरी आणि पेन बरोबर ठेवावे.

## शिक्षण परिषद होण्यापूर्वी केंद्र संसाधन गटाची बैठक आवश्यक आहे का?

शिक्षण परिषद प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण होण्याकरिता केंद्र संसाधन गटाच्या बैठका किमान शिक्षण परिषद होण्यापूर्वी होणे आवश्यक आहे. [संदर्भ: शासन निर्णय- २२ जून २०१५ (प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र) व १७ ऑक्टोबर २०१६ (विद्या प्राधिकरणाची पुनर्रचना)]

## शिक्षण परिषदेचे मूल्यांकन होणे आवश्यक आहे का आणि ते कोणी करावे?

शिक्षण परिषदेचे मासिक मूल्यांकन होणे आवश्यक आहे. शिक्षण परिषदेची वेळेत सुरुवात, विषयांची मांडणी, शिक्षकांचा सहभाग, विषयाची गुणवत्ता यावरून हे मूल्यांकन करता येईल. हे मूल्यांकन समूह साधन केंद्र समन्वयक आणि केंद्र संसाधन गटातील शिक्षक यांनी एकत्र करावे.

## शिक्षण परिषदेमध्ये विविध उपक्रमांचे प्रशिक्षण दिले जावे का?

नवीन कार्यक्रम, जिल्हा तसेच राज्य स्तरावरून आलेले उपक्रम यांची माहिती किंवा प्रशिक्षण शिक्षण परिषदेमध्ये देता येईल. मात्र त्याचे नियोजन केंद्र संसाधन गटाच्या बैठकीत होणे आवश्यक आहे. शिक्षण परिषदेचा मूळ उद्देश प्रशिक्षण देणे हा नसून शिक्षकांना एकमेकांच्या सहकार्याने वर्गप्रक्रिया अधिक नेमकी करता यावी हा आहे.

## कोणत्या गोष्टी टाळल्या तर शिक्षण परिषद अधिक प्रभावी होईल?

शिक्षण परिषद वेळेत पूर्ण व्हावी यासाठी प्रत्येक महिन्याला होणारे सत्कार समारंभ, जेवणावर वेळ घालविणे या गोष्टी टाळाव्या. त्यामुळे प्रत्यक्ष काम करण्यासाठी अधिक वेळ मिळेल.

## परिपक्व शिक्षण व्यवस्थेकडे

शिक्षण परिषदेच्या परिणामकारकतेचा विचार करताना हे लक्षात ठेवावे लागेल की 'ठरलेल्या दिवशी शिक्षण परिषद झाली का आणि त्यात नेमके काय घडले?' इतकाच विचार करणे पुरेसे होणार नाही. शिक्षण परिषदेनंतर त्यातील नियोजन वर्गात कसे अंमलात आणले जात आहे यावर शिक्षण परिषदेचे खरे यश ठरवावे लागेल.

प्रत्येक शैक्षणिक वर्षात शिक्षण परिषदेच्या माध्यमातून वर्गप्रक्रियांमध्ये नियमित सुधारणा घडवून आणल्या जातील. तसेच शासन निर्णय दिनांक ६ मे २०२६ नुसार किमान १० घड्याळी तासांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक क्षमता बांधणी उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यात वाढ होईल व विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक फलनिष्पत्ती प्राप्त होतील.



## संदर्भ:
## शासकीय धोरणे आणि जीआर

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९

२. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २०११

३. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय, २२ जून २०१५

४. शिक्षण परिषद शासन परिपत्रक, १ सप्टेंबर २०१६

५. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP २०२०)

६. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF २००५, २०२३)

७. राष्ट्रीय शिक्षक व्यावसायिक मानक (NPST)

८. शालेय मानके आणि मूल्यमापन आराखडा (NUEPA, २०१६)

gyan prakash FOUNDATION

ग्यानप्रकाश फाउंडेशन

ब्रम्हनाद, बंगला क्रमांक १९, सिंध को. ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी,
बाणेर रस्ता, औंध, पुणे – ४११००७

Phone ०२०- २७२९३०३१ Email: admin@gyanprakash.org